Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**January-2020**

**SPECIAL ISSUE-CCI**

# भारताच्या जडणघडणीत विचारवंताचे योगदान



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Anil D. Warghat
Associate Professor
Govt.College
of Education
Buldana Dist-Buldana

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Aadhar Publications**

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
January 2020

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार | प्रा.झरेकर आर.एस. | 1 |
| 2 | महिला सक्षमीकरण : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | प्रा.डॉ. वामन ए. खोब्रागडे | 5 |
| 3 | आचार्य विनोबा भावे यांचे भूदान ते ग्रामदान या चळवळी विषयीचे मत | प्रा.विलास मेश्राम | 10 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांची वर्तमान उपयुक्तता | विक्की अशोक रामटेके | 15 |
| 5 | महात्मा गांधीं आणि स्त्रीसक्षमीकरण | डॉ.वर्षा गंगणे | 20 |
| 6 | शेडयुल्ड कास्ट फेडरेशन | प्रा. मंगेश वाहाणे | 27 |
| 7 | महात्मा फुले यांचा राजकीय विचार: एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा डॉ नितीन उल्हासराव सराफ | 33 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी, उद्योगविषयक विचार | प्रा. वसुंधरा दत्ताराम साळुंखे | 38 |
| 9 | भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीचे स्थान | सहा.प्रा.एम.बी.रेवतकर | 42 |
| 10 | अष्टपैलू व्यक्तिमत्त्व : सावित्रीबाई फुले | प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 47 |
| 11 | संत गाडगेबाबांचा शैक्षणिक दृष्टिकोन | डॉ.प्रवीण धारपुरे | 53 |
| 12 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचा ग्रामगीतेतील ग्रामिण विकासातील सहभाग व कार्य | प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 57 |
| 13 | महात्मा गांधी के आर्थिक विचार | प्रा. डॉ.ए.बी.पटले | 61 |
| 14 | स्वामी विवेकानंदांचे धार्मिक विचार: एक दृष्टीक्षेप | डॉ.उज्ज्वला पाटील | 65 |
| 15 | शाहूमहाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान | प्रा.डॉ.सतिश हरलाल पारधी | 70 |
| 16 | भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री सक्षमीकरण विषयक विचाराचे व कार्याचे योगदान | प्रा.डॉ.प्रशांत वामनराव खेडकर | 73 |
| 17 | स्वामी विवेकानंदांचे धार्मिक विचार | डॉ.मीना काळेले | 77 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोडबिल | प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ | 80 |
| 20 | राष्ट्रसंतांची 'आदर्शग्राम' संकल्पना | प्रा. डॉ. सिद्राम किशनराव मुंडे | 84 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार | प्रा. मनोहर आनंदराव गुडधे | 92 |




Scanned with OKEN Scanner

B.Aadhar International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Special Issue
ISSN : 2278-9308 January 2020

# शेडयुल्ड कास्ट फेडरेशन

प्रा. मंगेश वाहाणे
सहाय्यक प्राध्यापक डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स पवनी जिल्हा–भंडारा

## प्रस्तावना

भारत देशात प्राचीन काळापासून अनेक स्थित्यंतरे घडून आलीत. पण हे स्थित्यंतरे घडत असतांना मात्र समाजातील एक घटक असलेल्या अस्पृश्याना, दलितांना शतकानूशतके अन्याय सहन करावा लागला. उपेक्षा व मानभंग जणू त्यांच्याच वाट्याला आले. ही स्थिती अनेक शतकापर्यंत कायम राहून अस्पृश वर्गाला समाजबाह्य ठरविण्यात आले. पुढे ब-याच वर्षानंतर १९ व्या शतकात भारतात वैचारिक जागृती होवू लागली. शिक्षणाचे महत्व वाढून त्यातूनच अस्पृश्यांच्या समस्यांकडे मानवतावादी दृष्टीकोनातून पाहिले जावू लागले. अस्पृश्य उद्धाराचा प्रारंभ दक्षिण भारतातून झाला. अस्पृश्यांच्या पतनाचे मुळ कारण त्यांचे अज्ञान आहे हे महात्मा ज्योतिबा फुल्यांनी ओळखून दलितांना शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले. अश्याच प्रकारचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य इतरही व्यक्तीच्या मार्फत होवू लागले. दलितांमध्ये जागृती आणण्यात विठ्ठल रामजी शिंदे व पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने नवे नेतृत्व लाभल्याने दलित चळवळ विलक्षण गतिमान होत गेली. डॉ. आंबेडकरांनी सुधारणेबरोबर दलितांना त्यांचे राजकीय अधिकार मिळावे या करीता एका राष्ट्रव्यापी संघटनेची गरज भासली. त्यातून जुलै १९४२ ला नागपूर येथे अखिल भारतीय शेडयुल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची स्थापना केली.

## ध्येय व उद्देश

शेडयुल्ड कास्ट फेडरेशने अस्पृश्यांना त्यांच्या राजकीय हक्काबाबत जागृत करून दलितांना स्वतःच्या अस्तीत्वाची जाणीव करण्याचे केलेले कार्य शेडयुल्ड कास्ट फेडरेशन पक्षाच्या माध्यमातून होवून पक्षाचे ध्येय समोर ठेवण्यात आले.

१) भारतातील अनुसुचीत जातींना त्यांच्या सामाजीक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्या करीता व शिक्षणाच्या माध्मातून प्रगती साधने.

२) अस्पृश्यांकरीता समानतेची संधी उपलब्ध करून अन्य वर्गासारखी परिस्थिती मिळविण्यास समर्थ होवू शकतील.

३) संपुर्ण भारतातील अनुसुचित जातीवर होणा-या अन्याय, अत्याचार, शोषण व त्यांच्या हक्कांचे उल्लंघन या संदर्भातील माहिती गोळा करणे.

४) शेतकरीवर्ग, भुमिहीन मजूर, कामगार तसेच इतर क्षेत्रातील लोकांना काम मिळवून देणे.

## शेडयुल्ड कास्ट फेडरेशन पक्षाच्या स्थापने पूर्वीची राजकीय व सामाजिक परिस्थिती

शेकडो वर्षे अन्याय, अत्याचार सहन केलेल्या अस्पृश्य वर्गाची स्थिती मृतप्राय जनावरांसारखी होती. बराच काळ लोटल्यानंतर पुढे १९ व्या व २० व्या शतकात दलित समाजात



Scanned with OKEN Scanner